मिरा भाईंदर महानगरपालिका

दिनांक 92/92/2024

(गोषवारा)

प्रकरण क्र. (309) दैनंदिन नारळाच्या झाडांच्या फांद्या व झाडांचा कचरा यावर स्वतंत्र प्रक्रिया करून विल्हेवाट लावण्याच्या प्रक्रिया प्रकल्पाबाबत.

:-

मिरा भाईंदर महानगरपालिका ही झपाटयाने वाढणारी महानगरपालिका आहे. महानगरपालिकेची लोकसंख्या ही आजमिती अंदाजे १५,००,००० असुन दैनंदिन क्षेत्रात सुमारे ४८२.५७० टन एवढा कचरा निर्माण होत आहे. सदर कचऱ्याचे विलीगीकरण करुन प्रक्रिया करणेकरिता महानगरपालिकेच्या विविध प्रकल्पांमध्ये पाठविण्यात येतो. त्यापैकी दैनंदिन नारळांच्या प्राप्त होणारा कचरा हा अंदाजे २० ते २५ टन आहे. सदर कचऱ्यावर दैनंदिन प्रक्रिया करुन विल्हेवाट लावणे आवश्यक आहे. सदर कचऱ्यावर Separately प्रक्रिया करुन विल्हेवाट लावल्यास दैनंदिन कचऱ्याच्या प्रकल्पावरील अतिरिक्त बोजा कमी होईल.

त्याचप्रमाणे महानगरपालिका क्षेत्रात वाढलेल्या झाडांची / फांदयाची छटाई कापणी करणे इ. कामे दैनंदिन चालक असतात. सदर झाडांचा देखील सुमारे २० ते २५ टन दैनंदिन कचरा निघत आहे. सदर कचऱ्यावर दैनंदिन प्रक्रिया करुन विल्हेवाट लावणे आवश्यक आहे. सदर कचऱ्यावर देखील स्वतंत्र प्रक्रिया करुन विल्हेवाट लावल्यास दैनंदिन कचऱ्याच्या प्रकल्पावरील अतिरिक्त बोजा कमी होईल.

वरिल दोन्ही कचरा यावर महानगरपालिकेने उपलब्ध करुन दिलेल्या जागेत स्वखर्चाने एकाच ठिकाणी एकत्रितरित्या प्रक्रिया करणे करिता इच्छुक कंपनीकडून EOI मागविणे करीता प्रशासकीय मंजुरी मिळणेस शिफ़ारस आहे.

(मा. आयुक्त महोदय यांचे मान्यतेने)

(सचिन सागर)
उपायुक्त(घ.व्य.प्रकल्प)
मिरा भाईंदर महानगरपालिका

मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रशासकीय ठराव दिनांक 12/12/2024

विषय क्र. (309) :- दैनंदिन नारळाच्या झाडांच्या फांद्या व झाडांचा कचरा यावर स्वतंत्र प्रक्रिया करून विल्हेवाट लावण्याच्या प्रक्रिया प्रकल्पाबाबत.

कार्यालयीन प्रस्तावना

मिरा भाईंदर महानगरपालिका ही झपाटयाने वाढणारी महानगरपालिका आहे. महानगरपालिकेची लोकसंख्या ही आजमिती अंदाजे १५,००,००० असुन दैनंदिन क्षेत्रात सुमारे ४८२.५७० टन एवढा कचरा निर्माण होत आहे. सदर कचऱ्याचे विलीगीकरण करुन प्रक्रिया करणेकरिता महानगरपालिकेच्या विविध प्रकल्पांमध्ये पाठविण्यात येतो. त्यापैकी दैनंदिन नारळांच्या प्राप्त होणारा कचरा हा अंदाजे २० ते २५ टन आहे. सदर कचऱ्यावर दैनंदिन प्रक्रिया करुन विल्हेवाट लावणे आवश्यक आहे. सदर कचऱ्यावर Separately प्रक्रिया करुन विल्हेवाट लावल्यास दैनंदिन कचऱ्याच्या प्रकल्पावरील अतिरिक्त बोजा कमी होईल.

त्याचप्रमाणे महानगरपालिका क्षेत्रात वाढलेल्या झाडांची / फांदयाची छटाई कापणी करणे इ. कामे दैनंदिन चालक असतात. सदर झाडांचा देखील सुमारे २० ते २५ टन दैनंदिन कचरा निघत आहे. सदर कचऱ्यावर दैनंदिन प्रक्रिया करुन विल्हेवाट लावणे आवश्यक आहे. सदर कचऱ्यावर देखील स्वतंत्र प्रक्रिया करुन विल्हेवाट लावल्यास दैनंदिन कचऱ्याच्या प्रकल्पावरील अतिरिक्त बोजा कमी होईल.

वरिल दोन्ही कचरा यावर महानगरपालिकेने उपलब्ध करुन दिलेल्या जागेत स्वखर्चाने एकाच ठिकाणी एकत्रितरित्या प्रक्रिया करणे करिता इच्छुक कंपनीकडून EOI मागवण्याच्या प्रस्तावास मा. प्रशासक यांची मंजुरी मिळावी असा कार्यालयीन प्रस्ताव प्रशासना मार्फत सादर करण्यात आला.

प्रशासकीच ठराव क्र. 309 दिनांक 12/12/2024

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील दैनंदिन नारळाच्या झाडांच्या फांद्या व झाडांचा कचरा यावर स्वतंत्र प्रक्रिया करून विल्हेवाट लावण्याच्या प्रक्रिया प्रकल्पाबाबत.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतुदी व विशेषत: कलम ४५२ (अ) च्या (१अ) व (१ब) नुसार, महाराष्ट्र शासन, नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक :- एमसीओ २०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/नवि-१४ दिनांक २६ ऑगस्ट २०२२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मी, संजय श्रीपतराव काटकर, प्रशासक, मिरा भाईंदर महानगरपालिका मा. महानगरपालिका महासभेच्या अधिकाराचा वापर करुन प्रशासनाने सादर केल्यानुसार महानगरपालिकेने उपलब्ध करुन दिलेल्या जागेत स्वखर्चाने एकाच ठिकाणी एकत्रितरित्या प्रक्रिया करणे करिता इच्छुक कंपनीकडून EOI मागवण्याच्या प्रस्तावास मंजुरी देण्यात येत आहे.

पुढिल आवश्यक कार्यवाही नियमानुसार संबंधित विभागाने विहित पदधतीने करावी.

(संजय श्रीपतराव काटकर (आ.प्र.से.)
आयुक्त तथा प्रशासक
मिरा भाईंदर महानगरपालिका

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. प्रशासकीय सभा दि.92/92 /2024

।। गोषवारा ।।

प्रकरण क्रमांक (302) अग्निशमन दलाकरीता 04 नग वॉटर बाउझर , 02 नग मिनी मल्टीपर्पज फायर टेंडर, 01 नग रेस्क्यु टेंडर, 01 नग ड्राय केमिकल पावडर (डी.सी.पी) फायर टेंडर व 01 नग रॅपिड इंटरवेंशन वेहिकल (आर.आय.व्ही.) ही वाहने खरेदी करिता निविदा काढणेकामी आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत...

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या अग्निशमन दलाकरीता 04 नग वॉटर बाउझर , 02 नग मिनी मल्टीपर्पज फायर टेंडर, 01 नग रेस्क्यु टेंडर, 01 नग ड्राय केमिकल पावडर (डी.सी.पी) फायर टेंडर व 01 नग रॅपिड इंटरवेंशन वेहिकल (आर.आय.व्ही.) ही वाहने खरेदी करिता निविदा काढणेकामी उद्योग उर्जा व कामगार विभागाच्या शासन निर्णयानुसार अंदाजपत्रक तयार करणेकरिता दरपत्रके मागविणेकरिता जा.क्र. मिभा/मनपा/ अग्नि/1348/2024-25 दि. 13/09/2024 अन्वये जाहीर सुचना महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली होती. तसेच जा.क्र. मिभा/मनपा/ अग्नि/903/2024-25 दि. 30/07/2024 रोजीचे पत्र., जा.क्र. मिभा/मनपा/ अग्नि/901/2024-25 दि. 30/07/2024 रोजीचे पत्र व जा.क्र. मिभा/मनपा/अग्नि/902/2024-25 दि. 30/07/2024 रोजीचे पत्रान्वये अनक्रमे बृहन्मुंबई महापालिका, वसई विरार शहर महानगरपालिका व ठाणे महानगरपालिका यांना पत्र देवुन दर मागविणेबाबत कळविले होते. सदरच्या महापालिकेकडुन या विभागास दर प्राप्त झालेले नाहीत. तसेच उक्त नमुद प्रसिध्द करणेत आलेल्या जाहीर सुचनेनुसार मे. वाडीया बॉडी बिल्डर्स, मे. न्यु एज फायर फायटिंग कं. लि. व मे. हायटेक सर्व्हिसेस व मे. आर्यन पंप्स ॲण्ड एन्वायरो सोलुशन्स प्रा. लि. यांनी या कार्यालयात दरपत्रके सादर केलेली आहेत. सदर कंपनीने सादर केलेले दराबाबत सविस्तर तपशील खालीलप्रमाणे.

अ.क्र	वाहनाचा प्रकार	परिमाण	मे. वाडिया बॉडी बिल्डर्स		मे. न्युएज फायर फायटिंग कं.		मे. हाय टेक सर्व्हिसेस		मे. आर्यन पंप्स ॲण्ड इन्वायरो सोलुशन प्रा. लि.	
			दर प्रति नग (सर्व करासह)	एकुण	दर प्रति नग (सर्व करासह)	एकुण	दर प्रति नग (सर्व करासह)	एकुण	दर प्रति नग (सर्व करासह)	एकुण
01	वॉटर बाउझर 18KL	04	1,95,00,000/-	7,80,00,000/-	2,03,73,043/-	8,14,92,172/-	2,00,74,000/-	8,02,96,000/-	1,93,87,910/-	7,75,51,640/-

02	मिनी मल्टीपर्पज फायर टेंडर	02	1,16,35,618/-	2,32,71,236/-	1,12,65,200/-	2,25,30,400/-	1,20,30,323/-	2,40,60,646/-	84,18,413/-	1,68,36,826/-
03	रेस्क्यु टेंडर	01	6,45,00,000/-	6,45,00,000/-	6,58,08,430/-	6,58,08,430/-	6,71,63,059/-	6,71,63,059/-	5,09,68,670/-	5,09,68,670/-
04	ड्राय केमिकल पावडर (डी.सी.पी) फायर टेंडर	01	2,02,00,000/-	2,13,56,090/-	2,09,38,875/-	2,09,38,875/-	2,13,56,0890/-	2,13,56,090/-	1,29,28,413/-	1,29,28,413/-
05	रॅपिड इंटरवेंशन वेहिकल (आर.आय.व्ही.)	01	1,41,56,327/-	1,41,56,327/-	1,46,99,695/-	1,46,99,695/-	1,37,89,289/-	1,37,89,289/-	1,06,14,200/-	1,06,14,200/-
	एकुण	**09**		**20,01,27,563/-**		**20,54,69,572/-**		**20,66,65,084/-**		**16,88,99,749/-**

वरिल तक्त्यानुसार 4 कंपनीच्या दरपत्रकांपैकी **मे. आर्यन पंप्स ॲण्ड इन्वायरो** यांनी सादर केलेले दर सर्वात कमी आहेत. त्यानुसार अग्निशमन विभागाकरिता 04 नग वॉटर बाउझर , 02 नग मिनी मल्टीपर्पज फायर टेंडर, 01 नग रेस्क्यु टेंडर, 01 नग ड्राय केमिकल पावडर (डी.सी.पी) फायर टेंडर व 01 नग रॅपिड इंटरवेंशन वेहिकल (आर.आय.व्ही.) ही वाहने खरेदी करिता एकुण रु. 16,88,99,749/- इतका खर्च अपेक्षित आहे. सदर दरास मा. शहर अभियंता यांनी तांत्रिक मान्यता दिलेली आहे.

सन 20224-25 या आर्थिक वर्षात **"नविन फायर फायटर खरेदी"** या लेखाशिर्षा अंतर्गत रु. 2890 लाख इतकी तरतुद करण्यात आलेली होती. **प्रशासकीय ठराव क्र. 99 दि. 08/08/2024** अन्वये पारीत पुर्ननियोजनाचा ठरावानुसार रु. 200.00 लाख इतकी रक्कम **"अग्निशमन पेट्रोल इंधन/वाहन दुरुस्ती"** या लेखाशिर्षात वर्ग करण्यात आलेली असल्याने सद्यस्थितीत **"नविन फायर फायटर खरेदी"** या लेखाशिर्षा अंतर्गत रु. 2690 लाख इतकी तरतुद शिल्लक आहे.

तरी अग्निशमन विभागाकरिता 04 नग वॉटर बाउझर , 02 नग मिनी मल्टीपर्पज फायर टेंडर, 01 नग रेस्क्यु टेंडर, 01 नग ड्राय केमिकल पावडर (डी.सी.पी) फायर टेंडर व 01 नग रॅपिड इंटरवेंशन वेहिकल (आर.आय.व्ही.) ही वाहने खरेदी करिता निविदा काढणेकामी मा. शहर अभियंता यांनी तांत्रिक मान्याता दिलेल्या सर्वात कमी दराच्या दरपत्रकानुसार येणाऱ्या खर्चाच्या **रु. 16,88,99,749/-** या रकमेस मा. प्रशासकीय सभेची मंजुरी मिळणेकरिता सदर प्रस्ताव मा. प्रशासक यांचे समोर मांडणेस शिफारस करण्यात येत आहे.

मा. आयुक्त सो यांचे मान्यतेने

डॉ. सचिन बागडे
उप-आयुक्त
अग्निशमन व आणीबाणी सेवा
मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. महासभा / स्थायी समिती सभा
गोषवारा प्राप्त दि. 10/12/2024 क्र. ६=०५ वा.
रजिस्टर नोंद क्र. 306 2024/25
10/12/24
सचिव विभाग
मिरा-भाईंदर महानगरपालिका

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. प्रशासकीय सभा दि.92/92/2024.

प्रकरण क्रमांक :- 302

विषय:- अग्निशमन दलाकरीता 04 नग वॉटर बाउझर , 02 नग मिनी मल्टीपर्पज फायर टेंडर, 01 नग रेस्क्यु टेंडर, 01 नग ड्राय केमिकल पावडर (डी.सी.पी) फायर टेंडर व 01 नग रॅपिड इंटरवेंशन वेहिकल (आर.आय.व्ही.) ही वाहने खरेदी करिता निविदा काढणेकामी आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत...

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या अग्निशमन दलाकरीता 04 नग वॉटर बाउझर , 02 नग मिनी मल्टीपर्पज फायर टेंडर, 01 नग रेस्क्यु टेंडर, 01 नग ड्राय केमिकल पावडर (डी.सी.पी) फायर टेंडर व 01 नग रॅपिड इंटरवेंशन वेहिकल (आर.आय.व्ही.) ही वाहने खरेदी करिता निविदा काढणेकामी उद्योग उर्जा व कामगार विभागाच्या शासन निर्णयानुसार अंदाजपत्रक तयार करणेकरिता दरपत्रके मागविणेकरिता जा.क्र. मिभा/मनपा/ अग्नि/1348/2024-25 दि. 13/09/2024 अन्वये जाहीर सुचना महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली होती. तसेच जा.क्र. मिभा/मनपा/ अग्नि/903/2024-25 दि. 30/07/2024 रोजीचे पत्र., जा.क्र. मिभा/मनपा/ अग्नि/901/2024-25 दि. 30/07/2024 रोजीचे पत्र व जा.क्र. मिभा/मनपा/अग्नि/902/2024-25 दि. 30/07/2024 रोजीचे पत्रान्वये अनक्रमे बृहन्मुंबई महापालिका, वसई विरार शहर महानगरपालिका व ठाणे महानगरपालिका यांना पत्र देवुन दर मागविणेबाबत कळविले होते. सदरच्या महापालिकेकडुन या विभागास दर प्राप्त झालेले नाहीत. तसेच उक्त नमुद प्रसिध्द करणेत आलेल्या जाहीर सुचनेनुसार मे. वाडीया बॉडी बिल्डर्स, मे. न्यु एज फायर फायटिंग कं. लि. व मे. हायटेक सर्व्हिसेस व मे. आर्यन पंप्स ॲण्ड एन्वायरो सोलुशन्स प्रा. लि. यांनी या कार्यालयात दरपत्रके सादर केलेली आहेत. सदर कंपनीने सादर केलेले दराबाबत सविस्तर तपशील खालीलप्रमाणे.

अ. क्र	वाहनाचा प्रकार	परिमाण	मे. वाडिया बॉडी बिल्डर्स		मे. न्युएज फायर फायटिंग कं.		मे. हाय टेक सर्व्हिसेस		मे. आर्यन पंप्स ॲण्ड इन्वायरो सोलुशन प्रा. लि.	
			दर प्रति नग (सर्व करासह)	एकुण	दर प्रति नग (सर्व करासह)	एकुण	दर प्रति नग (सर्व करासह)	एकुण	दर प्रति नग (सर्व करासह)	एकुण
01	वॉटर बाउझर 18KL	04	1,95,00,000/-	7,80,00,000/-	2,03,73,043/-	8,14,92,172/-	2,00,74,000/-	8,02,96,000/-	1,93,87,910/-	7,75,51,640/-
02	मिनी मल्टीपर्पज फायर टेंडर	02	1,16,35,618/-	2,32,71,236/-	1,12,65,200/-	2,25,30,400/-	1,20,30,323/-	2,40,60,646/-	84,18,413/-	1,68,36,826/-

03	रेस्क्यु टेंडर	01	6,45,00,000/-	6,45,00,000/-	6,58,08,430/-	6,58,08,430/-	6,71,63,059/-	6,71,63,059/-	5,09,68,670/-	5,09,68,670/-
04	ड्राय केमिकल पावडर (डी.सी.पी) फायर टेंडर	01	2,02,00,000/-	2,13,56,090/-	2,09,38,875/-	2,09,38,875/-	2,13,56,0890/-	2,13,56,090/-	1,29,28,413/-	1,29,28,413/-
05	रॅपिड इंटरवेंशन वेहिकल (आर.आय.व्ही.)	01	1,41,56,327/-	1,41,56,327/-	1,46,99,695/-	1,46,99,695/-	1,37,89,289/-	1,37,89,289/-	1,06,14,200/-	1,06,14,200/-
एकुण		**09**		**20,01,27,563/-**		**20,54,69,572/-**		**20,66,65,084/-**		**16,88,99,749/-**

वरिल तक्त्यानुसार 4 कंपनीच्या दरपत्रकांपैकी **मे. आर्यन पंप्स ॲण्ड इन्वायरो** यांनी सादर केलेले दर सर्वात कमी आहेत. त्यानुसार अग्निशमन विभागाकरिता 04 नग वॉटर बाउझर , 02 नग मिनी मल्टीपर्पज फायर टेंडर, 01 नग रेस्क्यु टेंडर, 01 नग ड्राय केमिकल पावडर (डी.सी.पी) फायर टेंडर व 01 नग रॅपिड इंटरवेंशन वेहिकल (आर.आय.व्ही.) ही वाहने खरेदी करिता एकुण रु. 16,88,99,749/- इतका खर्च अपेक्षित आहे. सदर दरास मा. शहर अभियंता यांनी तांत्रिक मान्यता दिलेली आहे.

सन 20224-25 या आर्थिक वर्षात **"नविन फायर फायटर खरेदी"** या लेखाशिर्षा अंतर्गत रु. 2890 लाख इतकी तरतुद करण्यात आलेली होती. **प्रशासकीय ठराव क्र. 99 दि. 08/08/2024** अन्वये पारीत पुर्ननियोजनाचा ठरावानुसार रु. 200.00 लाख इतकी रक्कम **"अग्निशमन पेट्रोल इंधन/वाहन दुरुस्ती"** या लेखाशिर्षात वर्ग करण्यात आलेली असल्याने सद्यस्थितीत **"नविन फायर फायटर खरेदी"** या लेखाशिर्षा अंतर्गत रु. 2690 लाख इतकी तरतुद शिल्लक आहे.

तरी अग्निशमन विभागाकरिता 04 नग वॉटर बाउझर , 02 नग मिनी मल्टीपर्पज फायर टेंडर, 01 नग रेस्क्यु टेंडर, 01 नग ड्राय केमिकल पावडर (डी.सी.पी) फायर टेंडर व 01 नग रॅपिड इंटरवेंशन वेहिकल (आर.आय.व्ही.) ही वाहने खरेदी करिता निविदा काढणेकामी मा. शहर अभियंता यांनी तांत्रिक मान्याता दिलेल्या सर्वात कमी दराच्या दरपत्रकानुसार येणाऱ्या खर्चाच्या **रु. 16,88,99,749/-** या रकमेस मा. प्रशासक तथा आयुक्त यांची मंजुरी मिळणेकरिता विभागाने प्रस्ताव मांडला आहे.

प्रशासकीय ठराव क्र. 302 दि. 12 /12 /2024

अग्निशमन विभागाकरिता 04 नग वॉटर बाउझर , 02 नग मिनी मल्टीपर्पज फायर टेंडर, 01 नग रेस्क्यु टेंडर, 01 नग ड्राय केमिकल पावडर (डी.सी.पी) फायर टेंडर व 01 नग रॅपिड इंटरवेंशन वेहिकल (आर.आय.व्ही.) ही वाहने खरेदी करिता निविदा काढणेकामी विभागाने सादर केलेल्या प्रस्तावाचे अवलोकन करण्यात आले.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक : एमसीओ 2020/प्र.क्र.71(भाग-2)/नवि-14 दि. 26/08/2022 अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतुदी व विशेषत: विशेषत: कलम 452 अ च्या (1अ) व (1ब) मधील तरतुदी मा. आयुक्त यांची

प्रशासक पदी नियुक्ती करण्यात आली असुन त्यांना अधिनियमातील सर्व अधिकार प्राप्त झाले आहेत. सदर अधिकारात उपरोक्त प्रस्तावास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम 73(क) नुसार खालीलप्रमाणे खर्चास मंजुरी देण्यात आहे.

अ.क्र.	वाहनाचा प्रकार	परिमाण	दर प्रति नग (सर्व करासह)	एकुण
01	वॉटर बाउझर 18KL	04	रु. 1,93,87,910/-	रु. 7,75,51,640/-
02	मिनी मल्टीपर्पज फायर टेंडर	02	रु. 84,18,413/-	रु. 1,68,36,826/-
03	रेस्क्यु टेंडर	01	रु. 5,09,68,670/-	रु. 5,09,68,670/-
04	ड्राय केमिकल पावडर (डी.सी.पी) फायर टेंडर	01	रु. 1,29,28,413/-	रु. 1,29,28,413/-
05	रॅपिड इंटरवेंशन वेहिकल (आर.आय.व्ही.)	01	रु. 1,06,14,200/-	रु. 1,06,14,200/-
एकुण		09		**रु. 16,88,99,749/-**

तरी अग्निशमन विभागाकरिता 04 नग वॉटर बाउझर, 02 नग मिनी मल्टीपर्पज फायर टेंडर, 01 नग रेस्क्यु टेंडर, 01 नग ड्राय केमिकल पावडर (डी.सी.पी) फायर टेंडर व 01 नग रॅपिड इंटरवेंशन वेहिकल (आर.आय.व्ही.) ही वाहने खरेदी करिता निविदा काढणेकामी वरिल प्रमाणे **रु. 16,88,99,749/-** या रकमेस मंजुरी देण्यात येत आहे.

पारित ठरावानुसार अग्निशमन विभागाने नियमानसुार पुढिल कार्यवाही करावी.

(वासुदेव शिरबळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

(संजय काटकर, भा. प्र. से.)
प्रशासक तथा आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

मिरा-भाईंदर महानगरपालिका

बांधकाम विभाग

//गोषवारा // दि. 9/12/2024

प्रकरण क्र. (303) :- "नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या परिक्षेत्रातील (मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या हद्दीतील) नागरी सेवा व सुविधा पुरविणे." कामांकरीता निधी मंजूर करुन देणेबाबत.

"नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या परिक्षेत्रातील (मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या हद्दीतील) नागरी सेवा व सुविधा पुरविणे." या योजनेतंर्गत खालील कामांसाठी निधी वितरीत करण्यास शासन निर्णय क्रमांक: संकिर्ण-2024/प्र.क्र.87/(181)/का.1411, दि. 14 ऑक्टोबर, 2024 अन्वये मंजूरी देण्यात आली आहे.

अ.क्र	कामांचे नांव	रक्कम (कोटी)	शासन हिस्सा (कोटी)
1	उत्तन रॉयल इंग्लिश स्कुल येथील रस्त्यावर गटार बांधणे.	1.00	1.00
2.	उत्तन पाण्याची टाकी जवळ वाचनालय व जेष्ठ नागरिक विरंगुळा केंद्र बांधणे.	2.50	2.50
3.	भाईंदर बेकरी लेन पाण्याचा निचरा होणेसाठी गटार बांधणे.	1.50	1.50
4.	मिरारोड रेल्वे स्टेशन बाहेरील वाहतूक सुरळीत होण्यासाठी विविध कामे करणे.	2.00	2.00
5.	भाईंदर पश्चिम बालाजी नगर ते इंदिरा कॉम्पलेक्स रेल्वे समांतर नाला दुरुस्ती व रस्त्यासाठी स्टॅम्प कॉंक्रीट करणे.	1.00	1.00
6.	मिरारोड शांती नगर भागातील स्थापत्य व पाईल लाईनची कामे करणे.	2.00	2.00
	एकुण रक्कम	**10.00**	**10.00**

वरील कामासाठी मिरा भाईंदर महानगरपालिकेचा हिस्सा राहणार नसून सदर खर्च महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पात तरतूद करुन करावा लागणार नाही. **रु. 10.00 कोटी** निधी शासनाकडून प्राप्त होणार आहे. सदर एकत्रित कामे करण्यास मान्यता देणेस व कामाची अंदाजपत्रके प्रस्तावासह प्रशासकीय मान्यतेसाठी मा.जिल्हाधिकारी, ठाणे यांचे कडे पाठविणेस मान्यता देणे आवश्यक आहे. सदर कामासाठी प्रशासकीय मान्यतेनंतर एकच निविदा मागविणेस शिफारस आहे.

नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक एमसीओ-2020/ प्र.क्र.71(भाग-21)/नवि-14 दि.26 ऑगस्ट 2022 अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतूद व विशेषत: कलम 452 अ चा (1अ) व (1ब) मधील तरतूदीनुसार मा.आयुक्त यांची प्रशासक पदी नियुक्ती करण्यात आली असून त्यांना अधिनियमातील सर्व अधिकार प्राप्त झाले आहेत.

तरी सदर प्राप्त अधिकारात वरील नमुद प्रस्तावास मान्यता देणेस शिफारस आहे.

(मा. आयुक्त सो., यांच्या मान्यतेने)

(दिपक खांबित)
शहर अभियंता
मिरा भाईंदर महानगरपालिका

PC12/2024-25/गोषवारा-6

मिरा-भाईंदर महानगरपालिका

प्रशासकीय ठराव क्र. 303 दिनांक 12 /12 /2024

विषय क्र. (303) :- मा. आयुक्त महोदयाकडील कामकाज

"नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या परिक्षेत्रातील (मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या हद्दीतील) नागरी सेवा व सुविधा पुरविणे." कामांकरीता निधी मंजूर करुन देणेबाबत.

कार्यालयीन प्रस्तावना

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात "नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या परिक्षेत्रातील (मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या हद्दीतील) नागरी सेवा व सुविधा पुरविणे." या योजनेतंर्गत खालील कामांसाठी निधी वितरीत करण्यास शासन निर्णय क्रमांक: संकिर्ण-2024/प्र.क्र.87/(181)/का.1411, दि. 14 ऑक्टोबर, 2024 अन्वये खालील कामांना मंजूरी देण्यात आली आहे.

अ.क्र	कामांचे नांव	रक्कम (कोटी)
1	उत्तन रॉयल इंग्लिश स्कुल येथील रस्त्यावर गटार बांधणे.	1.00
2.	उत्तन पाण्याची टाकी जवळ वाचनालय व जेष्ठ नागरिक विरंगुळा केंद्र बांधणे.	2.50
3.	भाईंदर बेकरी लेन पाण्याचा निचरा होणेसाठी गटार बांधणे.	1.50
4.	मिरारोड रेल्वे स्टेशन बाहेरील वाहतूक सुरळीत होण्यासाठी विविध कामे करणे.	2.00
5.	भाईंदर पश्चिम बालाजी नगर ते इंदिरा कॉम्पलेक्स रेल्वे समांतर नाला दुरुस्ती व रस्त्यासाठी स्टॅम्प कॉंक्रीट करणे.	1.00
6.	मिरारोड शांती नगर भागातील स्थापत्य व पाईल लाईनची कामे करणे.	2.00
	एकुण रक्कम	**10.00**

वरील कामासाठी मिरा भाईंदर महानगरपालिकेचा हिस्सा राहणार नसून सदर खर्च महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पात तरतूद करुन करावा लागणार नाही. **रु. 10.00 कोटी** निधी शासनाकडून प्राप्त होणार आहे. सदर कामे करण्यास एकत्रित मान्यता देणेस व कामाची अंदाजपत्रके प्रस्तावासह प्रशासकीय मान्यतेसाठी मा.जिल्हाधिकारी, ठाणे यांचे कडे पाठविणेस मान्यता देणे आवश्यक आहे.

नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक एमसीओ-2020/ प्र.क्र.71(भाग-21)/नवि-14 दि.26 ऑगस्ट 2022 अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतूद व विशेषत: कलम 452 अ चा (1अ) व (1ब) मधील तरतूदीनुसार मा.आयुक्त यांची प्रशासक पदी नियुक्ती करण्यात आली असून त्यांना अधिनियमातील सर्व अधिकार प्राप्त झाले आहेत. सदर कामे करण्यास मान्यता देणेस व कामाची अंदाजपत्रके प्रस्तावासह प्रशासकीय मान्यतेसाठी मा.जिल्हाधिकारी, ठाणे यांचे कडे पाठविणेस मान्यता देण्याचा व तदनंतर एकच निविदा मागविणेचा प्रस्ताव प्रशासनाने सादर केला आहे.

प्रशासकीय ठराव क्र.303 दिनांक 12/12/2024

"नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या परिक्षेत्रातील (मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या हद्दीतील) नागरी सेवा व सुविधा पुरविणे." योजनेंतर्गत निधी विकास करण्यासाठी मान्यता दिलेली विकास कामे करण्यास मान्यता देणे. या कामाच्या प्रस्तावाचे अवलोकन करण्यात आले.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतुदी व विशेषत: कलम 452 (अ) च्या (1अ) व (1ब) नुसार, महाराष्ट्र शासन, नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक :- एमसीओ 2020/प्र.क्र.71 (भाग-2)/नवि-14 दिनांक 26 ऑगस्ट 2022 अन्वये प्राप्त अधिकारानुसार मी, संजय काटकर, प्रशासक, मिरा भाईंदर महानगरपालिका मा. महानगरपालिका महासभेच्या अधिकाराचा वापर करुन प्रशासनाने सादर केलेल्या अनुसरुन खालील कामांच्या एकत्रित अंदाजपत्रकाच्या खर्चास व प्रशासकीय मान्यतेनंतर एकत्रित निविदा मागविणेस मान्यता देण्यात येत आहे.

अ.क्र	कामांचे नांव	रक्कम (कोटी)
1	उत्तन रॉयल इंग्लिश स्कुल येथील रस्त्यावर गटार बांधणे.	1.00
2.	उत्तन पाण्याची टाकी जवळ वाचनालय व जेष्ठ नागरिक विरंगुळा केंद्र बांधणे.	2.50
3.	भाईंदर बेकरी लेन पाण्याचा निचरा होणेसाठी गटार बांधणे.	1.50
4.	मिरारोड रेल्वे स्टेशन बाहेरील वाहतूक सुरळीत होण्यासाठी विविध कामे करणे.	2.00
5.	भाईंदर पश्चिम बालाजी नगर ते इंदिरा कॉम्पलेक्स रेल्वे समांतर नाला दुरुस्ती व रस्त्यासाठी स्टॅम्प कॉंक्रीट करणे.	1.00
6.	मिरारोड शांती नगर भागातील स्थापत्य व पाईल लाईनची कामे करणे.	2.00
	एकुण रक्कम	10.00

वरील कामाबाबतची पुढील कार्यवाही नियमानुसार संबधित विभागाने विहित पध्दतीने करावी.

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

(संजय काटकर, भाप्रसे)
प्रशासक तथा आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रत बांधकाम विभागाकडे योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना

PC-12/2024-25-ठराव-6

मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रशासकीय ठरावासाठी गोषवारा

// बांधकाम/ विद्युत विभाग //

दि. 12/12/2024

प्रकरण क्रमांक. (१०४) भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजना सन 2024-25 अंतर्गत विविध विकास कामे करणे कामी शासनास प्रस्ताव पाठविणेस मान्यता देणेबाबत.

// प्रस्तावना //

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजनेंतर्गत सन 2024-25 या वर्षासाठी मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील विविध विकास कामाचे प्रस्ताव सादर करणे अंतर्गत महाराष्ट्र शासन सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांचे कडील जा.क्र. सावियो-2024/प्र.क्र./749/अजाक दि.15/10/2024 रोजीच्या शासन निर्णयाव्दारे मंजूरी प्राप्त झालेली आहे. त्या अनुशंगाने खालीलप्रमाणे अंदाजपत्रके सादर करण्यात आली आहेत.

अ.क्र.	कामाचे नाव.	अंदाजित खर्च
1.	मिरारोड (पुर्व) प्रभाग क्र.13 मधील सिल्व्हर सरीता आपना घर फेस-3 येथे गार्डन विकसित करणे.	रु.1,00,00,000/-
2.	मिरारोड (पुर्व) प्रभाग क्र.13 मधील घोडबंदर येथील श्री. ओमकारेश्वर मंदिर परीसरात विविध स्थापत्य कामे करणे.	रु.2,00,00,000/-
3.	मिरारोड (पुर्व) प्रभाग क्र.13 मधील काशिगांव पोलिस चौकी ते आपना घर पर्यंतचा रस्ता सिमेंट कॉंक्रीट करणे.	रु.4,00,00,000/-
4.	मिरारोड (पुर्व) प्रभाग क्र.13 मधील शीतल कॉम्प्लेक्सच्या मागील नाल्यावर स्लॅब टाकणे.	रु.2,00,00,000/-
5.	भाईंदर (पुर्व) प्रभाग क्र.11 मधील नवघर स्मशानभूमी ते हनुमान मंदिर पर्यंतचा रस्ता सिमेंट कॉंक्रीट करणे.	रु.3,00,00,000/-
6.	भाईंदर (पुर्व) प्रभाग क्र.11 मधील नवघर गाव परीसरात विविध ठिकाणी गटारे बांधणे.	रु.1,00,00,000/-
	एकूण	**रु.13,00,00,000/-**

तरी वरील कामाचे रु.13,00,00,000/-- इतक्या रक्कमेचे अंदाजत्रक तयार करण्यात आले असुन प्रशासकीय व आर्थिक मान्यतेसाठी मा. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे यांचेकडे प्रस्ताव सादर करण्यासाठी प्रशासकीय ठरावाव्दारे मान्यता देण्यास शिफारस आहे.

(दिपक खांबित)
शहर अभियंता
मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. आयुक्त यांच्या मान्यतेने

PC-05/DK/24-25/MG-17

मिरा-भाईंदर महानगरपालिका

प्रशासकीय ठराव 308 दिनांक :- 12/12/2024

प्रकरण क्रमांक :- (308) भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजना सन 2024-25 अंतर्गत विविध विकास कामे करणे कामी शासनास प्रस्ताव पाठविणेस मान्यता देणे.

कार्यालयीन प्रस्तावना

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजनेंतर्गत सन 2024-25 या वर्षासाठी मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील विविध विकास कामाचे प्रस्ताव सादर करणे अंतर्गत महाराष्ट्र शासन सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांचे कडील जा.क्र. सावियो-2024/प्र.क्र./749/अजाक दि.15/10/2024 रोजीच्या शासन निर्णयाव्दारे मंजूरी प्राप्त झालेली आहे. त्या अनुशंगाने खालीलप्रमाणे अंदाजपत्रके सादर करण्यात आली आहेत.

अ.क्र.	कामाचे नाव.	अंदाजित खर्च
1.	मिरारोड (पुर्व) प्रभाग क्र.13 मधील सिल्व्हर सरीता आपना घर फेस-3 येथे गार्डन विकसित करणे.	रु.1,00,00,000/-
2.	मिरारोड (पुर्व) प्रभाग क्र.13 मधील घोडबंदर येथील श्री. ओमकारेश्वर मंदिर परीसरात विविध स्थापत्य कामे करणे.	रु.2,00,00,000/-
3.	मिरारोड (पुर्व) प्रभाग क्र.13 मधील काशिगांव पोलिस चौकी ते आपना घर पर्यंतचा रस्ता सिमेंट कॉंक्रीट करणे.	रु.4,00,00,000/-
4.	मिरारोड (पुर्व) प्रभाग क्र.13 मधील शीतल कॉम्प्लेक्सच्या मागील नाल्यावर स्लॅब टाकणे.	रु.2,00,00,000/-
5.	भाईंदर (पुर्व) प्रभाग क्र.11 मधील नवघर स्मशानभूमी ते हनुमान मंदिर पर्यंतचा रस्ता सिमेंट कॉंक्रीट करणे.	रु.3,00,00,000/-
6.	भाईंदर (पुर्व) प्रभाग क्र.11 मधील नवघर गाव परीसरात विविध ठिकाणी गटारे बांधणे.	रु.1,00,00,000/-
	एकूण	**रु.13,00,00,000/-**

तरी वरील कामाचे रु.13,00,00,000/-- इतक्या रक्कमेचे अंदाजत्रक तयार करण्यात आले असुन प्रशासकीय व आर्थिक मान्यतेसाठी मा. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे यांचेकडे प्रस्ताव सादर करण्यासाठी मान्यता देणेचा प्रशासनाचा प्रस्ताव आहे.

प्रशासकीय ठराव क्र.308 दिनांक 12/12/2024

वरील प्रस्तावाचे अवलोकन करण्यात आले. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतुदी व विशेषत: कलम 452 (अ) च्या (1अ) व (1ब) नुसार, महाराष्ट्र शासन, नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक :- एमसीओ 2020/प्र.क्र.71 (भाग-2)/ नवि-14 दिनांक 26 ऑगस्ट 2022 अन्वये प्राप्त अधिकारानुसार मी, श्री. संजय काटकर, प्रशासक, मिरा भाईंदर महानगरपालिका मा. महानगरपालिका महासभेच्या अधिकाराचा वापर

करुन प्रशासनाने सादर केल्यानूसार वरील कामांचे रु.13,00,00,000/-- इतक्या रक्कमेचे अंदाजत्रक तयार करण्यात आले असुन प्रशासकीय व आर्थिक मान्यतेसाठी मा. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे यांचेकडे प्रस्ताव सादर करण्यासाठी व एकत्रित निविदा मागविणेस ठरावाव्दारे मान्यता देण्यात येत आहे.

सदर कामाबाबतची पुढील कार्यवाही नियमानुसार संबधित विभागाने विहित पध्दतीने करावी.

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

(संजय काटकर, भाप्रसे)
प्रशासक तथा आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रत :- बांधकाम/ विद्युत विभागाकडे योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना

PC-05/DK/24-25/MT-30

मिरा भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.)

ता.जि.ठाणे

शिक्षण विभाग

मा. प्रशासकीय सभा दि.12/02/2024

// गोषवारा //

प्रकरण क्रं.304 :- मिरा भाईंदर महानगरपालिका शाळेतील विदयार्थ्यांकरीता सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करणेकरीता तरतुदीचे पुर्नविनियोजन करणेबाबत.

संदर्भ :- मा. आयुक्त सो. यांची E-964650 अन्वये मंजुरी.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील महानरगपालिका शाळेतील विदयार्थ्यांकरीता सन 2024-25 या आर्थिक वर्षात "सांस्कृतिक कार्यक्रमाचे" आयोजन करावयाचे आहे. सन 2024-25 या आर्थिक वर्षात "मानधनावर शिक्षक नेमणे/वार्षिक स्नेहसंम्मेलन/आदर्श शिक्षक पुरस्कार" अंतर्गत रु.05.00 लक्ष तरतुद केलेली असुन सदर ची तरतुद कमी असल्यामुळे सन 2024-25 या आर्थिक वर्षातील शिक्षण विभागाच्या अंदाजपत्रकातील "मनपा शाळा सादील खर्च/कायालयीन खर्च (पान क्रं.95)" या लेखाशिर्षा अंतर्गत रु.15.00 लक्ष तरतुद करण्यात आलेली आहे. सदर तरतुदीमधुन सांस्कृतीक कार्यक्रमाचे आयोजन करणेसाठी अतिरिक्त् रु.10.00 लक्ष इतक्या तरतुदची ची आवश्यकता आहे.

तरी "मनपा शाळा सादील खर्च/कायालयीन खर्च (पान क्रं.95)" या लेखाशिर्षा अंतर्गत रु.15.00 लक्ष तरतुदीमधुन "सांस्कृतिक कार्यक्रमाचे" आयोजन करणेकामी अंतर्गत रु.10.00 लक्ष इतक्या तरतुदीचे पुर्नविनियोजन करण्यास मा. प्रशासकीय ठराव करण्यास मंजुरी मिळणेस शिफारस आहे.

(प्रसाद शिंगटे)
उप-आयुक्त (शिक्षण विभाग)
मिरा भाईंदर महानगरपालिका

C:\Users\DELL\Desktop\शिक्षण 2024\thara gbs-dw.aa\गोषवारा सांस्कृतिक.doc

मिरा भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.)

ता.जि.ठाणे

शिक्षण विभाग

मा. प्रशासकीय सभा दि.१२/१२/2024

प्रकरण क्रं. 304 :- मिरा भाईंदर महानगरपालिका शाळेतील विदयार्थ्यांकरीता सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करणेकरीता तरतुदीचे पुर्नविनियोजन करणेबाबत.

प्रशासकीय ठराव क्रं.304 दिनांक : १२/१२/२०२४

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील महानरगपालिका शाळेतील विदयार्थ्यांकरीता सन 2024-25 या आर्थिक वर्षात "सांस्कृतिक कार्यक्रमाचे" आयोजन करावयाचे आहे. सन 2024-25 या आर्थिक वर्षात "मानधनावर शिक्षक नेमणे/वार्षिक स्नेहसंम्मेलन/आदर्श शिक्षक पुरस्कार" अंतर्गत रु.05.00 लक्ष तरतुद केलेली असुन सदरची तरतुद कमी असल्यामुळे सन 2024-25 या आर्थिक वर्षातील शिक्षण विभागाच्या अंदाजपत्रकातील "मनपा शाळा सादील खर्च/कायालयीन खर्च (पान क्रं.95)" या लेखाशिर्षा अंतर्गत रु.15.00 लक्ष तरतुद करण्यात आलेली आहे. सदर तरतुदीमधुन सांस्कृतीक कार्यक्रमाचे आयोजन करणेसाठी अतिरिक्त् रु.10.00 लक्ष इतक्या तरतुदची ची आवश्यकता आहे.

तरी "मनपा शाळा सादील खर्च/कायालयीन खर्च (पान क्रं.95)" या लेखाशिर्षा अंतर्गत रु.15.00 लक्ष तरतुदीमधुन "सांस्कृतिक कार्यक्रमाचे" आयोजन करणेकामी अंतर्गत रु.10.00 लक्ष इतक्या तरतुदीचे पुर्नविनियोजन करण्यास मा. प्रशासकीय ठरावाव्दारे मान्यता देण्यात येत आहे. पारित ठरावानुसार शिक्षण विभागाने पुढील कार्यवाही प्रस्तावित करावी.

(वासुदेव शिस्वळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

(संजय श्रीपतराव काटकर भा.प्र.से.)
आयुक्त तथा प्रशासक
मिरा भाईंदर महानगरपालिका

C:\Users\DELL\Desktop\शिक्षण 2024\shana ghoshwara\ठराव सांस्कृतिक.doc

मिरा भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.)

ता.जि.ठाणे

शिक्षण विभाग

मा. प्रशासकीय सभा दि.92/92/2024

// गोषवारा //

प्रकरण क्रं. 306 :- मिरा भाईंदर महानगरपालिका शाळेतील विदयार्थ्यांकरीता कला- क्रीडा महोत्सवा अंतर्गत क्रीडा स्पर्धांचे आयोजन करणेकरीता तरतुदीचे पुर्नविनियोजन करणेबाबत.

संदर्भ :- मा. आयुक्त सो. यांची E-964734 अन्वये मंजुरी.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील महानरगपालिका शाळेतील विदयार्थ्यांकरीता सन 2024-25 या आर्थिक वर्षात "कला-क्रीडा महोत्सव्" अंतर्गत क्रीडा स्पर्धांचे आयोजन करावयाचे आहे.

सन 2024-25 या आर्थिक वर्षात क्रीडा विभागा अंदाजपत्रकात "कला-क्रीडा महोत्सव" अंतर्गत तरतुद केलेली नसल्यामुळे सन 2024-25 या आर्थिक वर्षातील शिक्षण विभागाच्या अंदाजपत्रकातील "समावेशित शिक्षण (दिव्यांग/ प्रशिक्षण/ शिबीर/ गुणगौरव सोहळा/ साहित्य/ थेरपी (पान क्रं.95)" या लेखाशिर्षा अंतर्गत रु.45.00 लक्ष तरतुद करण्यात आलेली आहे. कला-क्रीडा महोत्स्व अंतर्गत क्रीडा स्पर्धांचे आयोजन करणेसाठी रु.40.00 लक्ष इतक्या तरतुदची ची आवश्यकता आहे.

तरी "समावेशित शिक्षण (दिव्यांग/ प्रशिक्षण/ शिबीर/ गुणगौरव सोहळा/ साहित्य/ थेरपी (पान क्रं.95)" या लेखाशिर्षा अंतर्गत रु.45.00 लक्ष तरतुदीमधुन महानगरपालिका शाळेतील विदयार्थ्यांसाठी कला-क्रीडा महोत्सवा अंतर्गत क्रीडा स्पर्धांचे आयोजन करणेकामी रु.40.00 लक्ष इतक्या तरतुदीचे पुर्नविनियोजन करण्यास मा. प्रशासकीय ठराव करण्यास मंजुरी मिळणेस शिफारस आहे.

(प्रसाद शिंगटे)
उप-आयुक्त (शिक्षण विभाग)
मिरा भाईंदर महानगरपालिका

मिरा भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.)

ता.जि.ठाणे

शिक्षण विभाग

मा. प्रशासकीय सभा दि.१२/१२/2024

प्रकरण क्रं. 306 :- मिरा भाईंदर महानगरपालिका शाळेतील विदयार्थ्यांकरीता कला- क्रीडा महोत्सवा अंतर्गत क्रीडा स्पर्धांचे आयोजन करणेकरीता तरतुदीचे पुर्नविनियोजन करणेबाबत.

प्रशासकीय ठराव क्रं.306 दिनांक : १२/१२/2024

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील महानरगपालिका शाळेतील विदयार्थ्यांकरीता सन 2024-25 या आर्थिक वर्षात "कला-क्रीडा महोत्सव्" अंतर्गत क्रीडा स्पर्धांचे आयोजन करावयाचे आहे.

सन 2024-25 या आर्थिक वर्षात क्रीडा विभागा अंदाजपत्रकात "कला-क्रीडा महोत्सव" अंतर्गत तरतुद केलेली नसल्यामुळे सन 2024-25 या आर्थिक वर्षातील शिक्षण विभागाच्या अंदाजपत्रकातील "समावेशित शिक्षण (दिव्यांग/ प्रशिक्षण/ शिबीर/ गुणगौरव सोहळा/ साहित्य/ थेरपी (पान क्रं.95)" या लेखाशिर्षा अंतर्गत रु.45.00 लक्ष तरतुद करण्यात आलेली आहे. कला-क्रीडा महोत्स्व अंतर्गत क्रीडा स्पर्धांचे आयोजन करणेसाठी रु.40.00 लक्ष इतक्या तरतुदची ची आवश्यकता आहे.

तरी "समावेशित शिक्षण (दिव्यांग/ प्रशिक्षण/ शिबीर/ गुणगौरव सोहळा/ साहित्य/ थेरपी (पान क्रं.95)" या लेखाशिर्षा अंतर्गत रु.45.00 लक्ष तरतुदीमधुन महानगरपालिका शाळेतील विदयार्थ्यांसाठी कला-क्रीडा महोत्सवा अंतर्गत क्रीडा स्पर्धांचे आयोजन करणेकामी रु.40.00 लक्ष इतक्या तरतुदीचे पुर्नविनियोजन करण्यास मा. प्रशासकीय ठरावाव्दारे मान्यता देण्यात येत आहे. पारित ठरावानुसार शिक्षण विभागाने पुढील कार्यवाही प्रस्तावित करावी.

(वासुदेव शिरसळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

(संजय श्रीपतराव काटकर आ.प्र.से.)
आयुक्त तथा प्रशासक
मिरा भाईंदर महानगरपालिका

C:\Users\DELL\Desktop\शिक्षण 2024\dhiraj.ghoshwar\ठराव\क्रीडा विभाग अंतर्गत टेबल आटा करणेकरीता तरतुदीचे पुर्नविनियोजन करणेबाबत.doc

मिरा भाईंदर महानगरपालिका

घनकचरा व्यवस्थापन विभाग

// प्रशासकीय गोषवारा //

306 दि.24/12/2024

प्रकरण क्र :- मा. आयुक्त यांनी मंजुर केलेल्या प्रस्तावाचे अवलोकन करणे
(घनकचरा व्यवस्थापन विभाग)

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात स्वच्छ भारत अभियान अंतर्गत स्वच्छ सर्वेक्षण अंतर्गत विविध उपक्रम व कार्यक्रम घेण्यात आले असुन त्यानुसार खालीलप्रमाणे विविध कामाच्या प्रस्तावास मा. आयुक्त यांनी खालीलप्रमाणे मंजुरी दिलेली आहे.

अ.क्र	कामाचा तपशिल	खर्च झालेला रक्कम
1.	स्वच्छ भारत अभियान अंतर्गत सर्वोत्कृष्ट, स्वच्छ सोसायटी, शाळा, हॉटेल, हॉस्पिटल, शासकीय कार्यालये व मार्केट असोसिएशन यांना पारितोषिक प्रदान.	रु. 1,78,000/-
2.	दि. 09, मार्च 2024 रोजी शहरातील नेमुन दिलेल्या ठिकाणापासुन ते स्व. बाळासाहेब ठाकरे मैदान या ठिकाणी पिपल्स डिप क्लिन ड्राईव्ह (People's Deep Clean Drive) कार्यक्रमाकरीता फोटोग्राफी, विडिओग्राफी, ड्रोन शुट, लाईव मिक्सर सेटअप, एल.ई.डी. टि.व्ही., प्लाझमा टि.व्ही. पुरवठा	रु. 7,82,220/-
3.	मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात "स्वभाव स्वच्छता - संस्कार स्वच्छता" हे अभियान दि. 21 सप्टेंबर, 2024 रोजी मेगा बिच क्लिनअप ड्राईव्ह कार्यक्रमाकरीता चहा व कांदा पोहा पुरवठा	रु. 51,800/-
4.	मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात "स्वभाव स्वच्छता - संस्कार स्वच्छता" हे अभियान कार्यक्रमाकरीता स्टॅन्डी फ्रेम, विडीओग्राफी व फोटोग्राफी, ड्रोनसह पुरवठा	रु.1,52,350/-
5.	मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात "स्वभाव स्वच्छता - संस्कार स्वच्छता" हे अभियान कार्यक्रमाकरीता बिस्कीट छोटे पॅकेट, हॅन्डग्लोज, मास्क, ज्युट गारबेज बॅग, टी-शर्ट, टोपी, झेंडे, सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र विथ फ्रेम, प्रमाणपत्र पुरवठा	रु. 3,85,900/-

घनकचरा व्यवस्थापन विभागामार्फत स्वच्छ सर्वेक्षण 2023 व स्वच्छ सर्वेक्षण 2024 करीता अ.क्र. 01 ते 05 करीता वरील नमुद केलेली कामे पुर्ण करून घेण्यात आलेली आहेत.

तरी, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसूची "ड" नुसार मा. प्रशासकीय सभेच्या मंजुरीस अवलोकनार्थ सादर.

(मा. आयुक्त यांच्या मान्यतेने)

(डॉ. सचिन सागर)
उपायुक्त (घ.व्य.)
मिरा भाईंदर महानगरपालिका

E:\Nirbhay Patil\Public Health\Raj Documents\STANDING GOSHVARA\2022-23\Avlokan SBM 2024.docx

मिरा भाईंदर महानगरपालिका

घनकचरा व्यवस्थापन विभाग

प्रशासकीय ठराव क्र.३०७ दि.१२/१२/2024

प्रकरण क्र. :- ३०७ मा. आयुक्त यांनी मंजुर केलेल्या प्रस्तावाचे अवलोकन करणे (घनकचरा व्यवस्थापन विभाग)

ठराव क्र. :- ३०७

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात स्वच्छ भारत अभियान अंतर्गत स्वच्छ सर्वेक्षण अंतर्गत विविध उपक्रम व कार्यक्रम घेण्यात आले असुन त्यानुसार खालीलप्रमाणे विविध कामाच्या प्रस्तावास मा. आयुक्त यांनी खालीलप्रमाणे मंजुरी दिलेली आहे.

अ.क्र	कामाचा तपशिल	खर्च झालेला रक्कम
1.	स्वच्छ भारत अभियान अंतर्गत सर्वोत्कृष्ट स्वच्छ सोसायटी, शाळा, हॉटेल, हॉस्पिटल, शासकीय कार्यालये व मार्केट असोसिएशन यांना पारितोषिक प्रदान करणे.	रु. 1,78,000/-
2.	दि. 09, मार्च 2024 रोजी शहरातील नेमुन दिलेल्या ठिकाणापासुन ते स्व. बाळासाहेब ठाकरे मैदान या ठिकाणी पिपल्स डिप क्लिन ड्राईव्ह (People's Deep Clean Drive) कार्यक्रमाकरीता फोटोग्राफी, विडिओग्राफी, ड्रोन शुट, लाईव मिक्सर सेटअप, एल.ई.डी. टि.व्ही., प्लाझमा टि.व्ही. पुरवठा करणे.	रु. 7,82,220/-
3.	मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात "स्वभाव स्वच्छता - संस्कार स्वच्छता" हे अभियान दि. 21 सप्टेंबर, 2024 रोजी मेगा बिच क्लिनअप ड्राईव्ह कार्यक्रमाकरीता चहा व कांदा पोहा पुरवठा करणे.	रु. 51,800/-
4.	मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात "स्वभाव स्वच्छता - संस्कार स्वच्छता" हे अभियान कार्यक्रमाकरीता स्टॅन्डी फ्रेम, विडीओग्राफी व फोटोग्राफी, ड्रोनसह पुरवठा करणे.	रु.1,52,350/-
5.	मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात "स्वभाव स्वच्छता - संस्कार स्वच्छता" हे अभियान कार्यक्रमाकरीता बिस्कीट छोटे पॅकेट, हॅन्डग्लोज, मास्क, ज्युट गारबेज बॅग, टी-शर्ट, टोपी, झेंडे, सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र विथ फ्रेम, प्रमाणपत्र पुरवठा करणे.	रु. 3,85,900/-

घनकचरा व्यवस्थापन विभागामार्फत स्वच्छ सर्वेक्षण 2023 व स्वच्छ सर्वेक्षण 2024 करीता अ.क्र. 01 ते 05 करीता वरील नमुद केलेली कामे पुर्ण करून घेण्यात आलेली आहेत.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसूची "ड" नुसार मा. प्रशासकीय सभेच्या मंजुरीस अवलोकनार्थ सादर केले असता आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक एमसीओ-2020प्र.क्र.71 (भाग-2)/ नवि-14, दि. 26 ऑगस्ट 2022 अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतुद व विशेषत: कलम 452 अ च्या (1 अ) व (1 ब) मधील तरतुदीनुसार मा. आयुक्त यांनी प्रशासक पदी नियुक्ती करण्यात आली असुन त्यांना अधिनियमातील सर्व अधिकार प्राप्त झाले आहेत. सदर अधिकारात उपरोक्त कामास मान्यता देत आहे. पारित ठरावानुसार घनकचरा व्यवस्थापन विभागाने नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

(संजय श्रीपतराव काटकर,भा.प्र.से.)
प्रशासक तथा आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रशासकीय ठरावासाठी गोषवारा

// बांधकाम/ विद्युत विभाग //

दि. १२/१२/२०२४

प्रकरण क्रमांक (30८) :- मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या विविध मालमत्ता भाड्याने देताना देण्यात येणारी सवलत रद्द करणेबाबत पारीत मा.प्रशासकिय ठराव क्र.271 दि.14/10/2024 अधिनियम करुन नविन धोरण निश्चित करणे.

मिरा भाईंदर महानगरपालिकेची विविध समाज मंदिरातील जागा, सभागृह, उद्याने, मैदाने, मेडीटेशन सेंटर, पार्कींग आरक्षणाच्या जागा, रस्ते व सार्वजनिक जागा विविध खाजगी कार्यक्रमासाठी भाड्याने देण्यात येत आहेत. सदर जागा अल्प मुदत तसेच दीर्घ मुदतीसाठी भाड्याने देणेबाबत महानगरपालिकेने मा. महासभा, मा. स्थायी समिती सभा तसेच प्रशासकीय ठरावाव्दारे धोरण निश्चित केले आहेत. त्यानूसार सदर मालमत्ता मधील निश्चित केलेल्या भाड्यात सवलत देणे किंवा मोफत वापरासाठी देणेची कार्यवाही करण्यात येत आहे.

तथापी सदर सवलत व मोफत वापरास देणेबाबत लेखापरीक्षण विभाग तसेच नागरीक/ लोकप्रतिनिधी मार्फत कायदेशिर तरतूदीबाबतची विचारणा करण्यात येते व मनपाचे उत्पन्न बुडते याबाबत देखिल आक्षेप नोंदविले जात आहेत.

सदर सर्व मालमत्ता तयार करणेची मोठ्या प्रमाणावर खर्च करण्यात आला असून त्यांच्या देखभाल व दुरूस्तीवर देखिल खर्च होत असल्याने सदर मालमत्ता भाड्याने देऊन मनपाचे नुकसान करणे तसेच मालमत्ता वापर करणाऱ्यांकडून देखिल नासधुस केली जात असल्याने सदर मालमत्ता सुव्यवस्थित करण्यासाठी पुन्हा खर्च येत असतो.

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सर्व मालमत्तांचे वाणीज्य वापराच्या दृष्टीने भाडे ठरविणेसाठी एजन्सी नेमण्यासाठी निविदा प्रक्रीया करण्यात आली असून त्याचे मार्फत सर्व मालमत्ता भाड्याने देणेसाठी चालू बाजार भावानूसार होणारे भाडे ठरवून घेण्यात येणार आहे व सदर प्रस्ताव प्रशासकीय ठरावासाठी देखिल देण्यात येणार आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 79 मधील तरतूदीनूसार महानगरपालिकेची मालमत्ता ही चालू बाजार भावापेक्षा कमी भाडे दराने देता येणार नाही अशी स्पष्ट तरतूद आहे. तथापी कलम 79 (ग) मध्ये वैद्यकीय व शैक्षणिक कार्यासाठी मालमत्ता चालू बाजार भावापेक्षा कमी भाडे दराने देणेसाठी महानगरपालिकेस राज्य शासनाच्या मान्यतेने कार्यवाही करता येईल अशी तरतूद आहे.

मा.प्रशासकीय ठराव क्र. 271 दि.14/10/2024 अधिनियम करण्यास व खालील धोरण निश्चित करण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे.

1) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 79 मधील तरतूदीनूसार तसेच शासनाकडील दि.07/11/2023 व दि.09/10/2024 रोजीच्या शासन निर्णयानुसार चालू बाजार भावानुसार भाडे निश्चित करून मालमत्तांचे भाडे आकारावयाचे असल्याने मनपाची कोणतीही मालमत्ता देण्याबाबत या पुर्वी पारीत ठरावातील विनामुल्य व सवलतीच्या दराने देणेचा भाग रद्द करण्यात येत आहे.

2) मैदान / जागा भाड्याने देताना कार्यक्रमाच्या कालावधीचा विचार न करता कार्यक्रमासाठी स्टेज/ मंडप उभारणी कालावधी व मंडप स्टेजचे सामान जो पर्यंत मैदानात शिल्लक असेल त्या कालावधी पर्यंत भाड्याची व दंडाच्या रकमेची गणना करण्यात यावी व सदर रक्कम अनामत रक्कमेतून वजा करण्यात यावी.

3) सदर मैदानाच्या मंडपासाठी खड्डे न करता ड्रम अथवा इतर व्यवस्था करुन मंडप उभे करावे.

4) सदर मैदानाच्या संरचनेत भौतिक बदल न करण्याच्या हमीवर मागणी करणाऱ्या नोंदणीकृत व संस्थेचे लेखापरीक्षण करणाऱ्या अर्जदार संस्था व खेळाच्या कार्यक्रमासाठी रु.5.00 लक्ष अनामत रक्कम घेण्यात येऊ नये. अवजड वाहनांना मैदानामध्ये सामान घेऊन जाण्यासाठी प्रवेश बंदी राहील.

5) सदर मैदान / जागा पुर्ववत करण्यासाठी रु.5.00 लक्ष रक्कम भाडेबाबत परवानगी देताना सुरक्षा अनामत रक्कम जमा करून घेण्यात यावी. सदर मैदान खराब व नादुरूस्त केल्यास सदर सुरक्षा अनामत रक्कम जप्त करण्यात यावी. जर सदर ठिकाणी विनापरवानगी व भाडे न भरता तात्पुरते स्ट्रक्चर उभारल्यास व त्याचे भाडे जमा केले नसल्यास सदर जागा पुर्ववत करण्यासाठी लागणारी रक्कम वसुल करण्यात यावी

वरील निर्णयाची विभागाने अंमलबजावणी करावी.

वरील प्रस्तावाबाबत प्रशासकीय ठरावाद्वारे निर्णय होणेस विनंती आहे.

(दिपक खांबित)
शहर अभियंता
मिरा-भाईंदर महानगरपालिका

PC-2/2024-25/DK/MG-2

मा. महापौर/प्रशासकीय समिती सभा
गोषवारा प्राप्त दि. १२/१२/२४ २०२४-२५
रजिस्टर नोंद अ. क्र. 393
लिपि
सचिव विभाग
मिरा-भाईंदर महानगरपालिका

मिरा-भाईंदर महानगरपालिका

प्रशासकीय ठराव 308 दिनांक :- १२/१२/२०२४

प्रकरण क्रमांक :- (308) मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या विविध मालमत्ता भाड्याने देताना देण्यात येणारी सवलत रद्द करणेबाबत पारीत मा.प्रशासकिय ठराव क्र.271 दि.14/10/2024 अधिक्रमित करुन नविन धोरण निश्चित करणे.

कार्यालयीन प्रस्तावना

मिरा भाईंदर महानगरपालिकेची विविध समाज मंदिरातील जागा, सभागृह, उद्याने, मैदाने, मेडीटेशन सेंटर, पार्कींग आरक्षणाच्या जागा, रस्ते व सार्वजनिक जागा विविध खाजगी कार्यक्रमासाठी भाड्याने देण्यात येत आहेत. सदर जागा अल्प मुदत तसेच दीर्घ मुदतीसाठी भाड्याने देणेबाबत महानगरपालिकेने मा. महासभा, मा. स्थायी समिती सभा तसेच प्रशासकीय ठरावाव्दारे धोरण निश्चित केले आहेत. त्यानूसार सदर मालमत्ता मधील निश्चित केलेल्या भाड्यात सवलत देणे किंवा मोफत वापरासाठी देणेची कार्यवाही करण्यात येत आहे.

तथापी सदर सवलत व मोफत वापरास देणेबाबत लेखापरीक्षण विभाग तसेच नागरीक/ लोकप्रतिनिधी मार्फत कायदेशिर तरतूदीबाबतची विचारणा करण्यात येते व मनपाचे उत्पन्न बुडते याबाबत देखिल आक्षेप नोंदविले जात आहेत.

सदर सर्व मालमत्ता तयार करणेची मोठ्या प्रमाणावर खर्च करण्यात आला असून त्यांच्या देखभाल व दुरूस्तीवर देखिल खर्च होत असल्याने सदर मालमत्ता भाड्याने देऊन मनपाचे नुकसान करणे तसेच मालमत्ता वापर करणाऱ्यांकडून देखिल नासधुस केली जात असल्याने सदर मालमत्ता सुव्यवस्थित करण्यासाठी पुन्हा खर्च येत असतो.

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सर्व मालमत्तांचे वाणीज्य वापराच्या दृष्टीने भाडे ठरविणेसाठी एजन्सी नेमण्यासाठी निविदा प्रक्रीया करण्यात आली असून त्यांचे मार्फत सर्व मालमत्ता भाड्याने देणेसाठी चालू बाजार भावानूसार होणारे भाडे ठरवून घेण्यात येणार आहे व सदर प्रस्ताव प्रशासकीय ठरावासाठी देखिल देण्यात येणार आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 79 मधील तरतूदीनूसार महानगरपालिकेची मालमत्ता ही चालू बाजार भावापेक्षा कमी भाडे दराने देता येणार नाही अशी स्पष्ट तरतूद आहे. तथापी कलम 79 (ग) मध्ये वैद्यकीय व शैक्षणिक कार्यासाठी मालमत्ता चालू बाजार भावापेक्षा कमी भाडे दराने देणेसाठी महानगरपालिकेस राज्य शासनाच्या मान्यतेने कार्यवाही करता येईल अशी तरतूद आहे.

वरील वस्तुस्थिती पहाता महानगरपालिकेची मालमत्ता भाड्याने देताना सदर अधिनियमातील तरतूदीचे काटेकोर पालन व्हावे यासाठी यापुर्वी महानगरपालिकेने दिलेल्या सवलती रद्द करणेबाबत सदर ठरावात दुरूस्ती होणेस व सर्व मालमत्तांचे चालू बाजार भावानूसार नेमण्यात येणाऱ्या एजन्सीकडून भाडे ठरवून घेवून त्याची अंमलबजावणी करणेस प्रस्तावित करण्यात येत आहे.

तसेच खाजगी संस्थामार्फत मैदान भाड्याने घेतल्यानंतर सदर मैदानाची मोठ्या प्रमाणावर खोदाई करून नासधुस करण्यात येते व सदर मैदान पुर्ववत करण्यासाठी महानगरपालिकेस दर वेळेस मोठा खर्च करावा लागतो. त्यामुळे सदर मैदानाच्या भाड्यासोबत रु.5.00 लक्ष रक्कम अनामत अथवा नापरतावा अशी एकरकमी परवानगी वेळेस जमा करून घेणे योग्य होईल.

प्रशासकीय ठराव क्र.३०८ दिनांक २२/१२ /2024

वरील प्रस्तावाचे अवलोकन करण्यात आले. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतूदी व विशेषत: कलम 452 (अ) च्या (1अ) व 1 (ब) नुसार, महाराष्ट्र शासन, नगर विकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक :- एमओसी/2020/प्र.क्र.71(भाग-2)/नवि-14 दिनांक 26 ऑगस्ट 2022 अन्वये प्राप्त अधिकारानुसार मी श्री. संजय श्रीपतराव काटकर, प्रशासक, मिरा भाईंदर महानगरपालिका मा. महानगरपालिका मा. महासभेच्या अधिकाराचा वापर करून प्रशासनाने सादर केलेल्या प्रस्तावानुसार खालील निर्णय घेत आहे.

1) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 79 मधील तरतूदीनूसार तसेच शासनाकडील दि.07/11/2023 व दि.09/10/2024 रोजीच्या शासन निर्णयानुसार चालू बाजार भावानुसार भाडे निश्चित करून मालमत्तांचे भाडे आकारावयाचे असल्याने मनपाची कोणतीही मालमत्ता देण्याबाबत या पुर्वी पारीत ठरावातील विनामुल्य व सवलतीच्या दराने देणेचा भाग रद्द करण्यात येत आहे.
2) मैदान / जागा भाड्याने देताना कार्यक्रमाच्या कालावधीचा विचार न करता कार्यक्रमासाठी स्टेज/ मंडप उभारणी कालावधी व मंडप स्टेजचे सामान जो पर्यंत मैदानात शिल्लक असेल त्या कालावधी पर्यंत भाड्याची व दंडाच्या रकमेची गणना करण्यात यावी व सदर रक्कम अनामत रक्कमेतून वजा करण्यात यावी.
3) सदर मैदानाच्या मंडपासाठी खड्डे न करता ड्रम अथवा इतर व्यवस्था करुन मंडप उभे करावे.
4) सदर मैदानाच्या संरचनेत भौतिक बदल व खोदकाम न करण्याच्या हमीवर मागणी करणाऱ्या नोंदणीकृत व संस्थेचे लेखापरीक्षण करणाऱ्या अर्जदार संस्था व खेळाच्या कार्यक्रमासाठी रु.5.00 लक्ष अनामत रक्कम घेण्यात येऊ नये.
5) अवजड वाहनांना मैदानामध्ये सामान घेऊन जाण्यासाठी प्रवेश बंदी राहील.
6) सदर मैदान / जागा पुर्ववत करण्यासाठी रु.5.00 लक्ष रक्कम भाडेबाबत परवानगी देताना सुरक्षा अनामत रक्कम जमा करून घेण्यात यावी. सदर मैदान खराब व नादुरूस्त केल्यास सदर सुरक्षा अनामत रक्कम जप्त करण्यात यावी. जर सदर ठिकाणी विनापरवानगी व भाडे न भरता तात्पुरते स्ट्रक्चर उभारल्यास व त्याचे भाडे जमा केले नसल्यास सदर जागा पुर्ववत करण्यासाठी लागणारी रक्कम वसुल करण्यात यावी.
7) वरील अटी व शर्तीचे उल्लघन करणाऱ्या संस्था पुढील कार्यक्रमाचे आयोजनास अर्ज करण्यासाठी अपात्र ठरवण्यात येतील.

वरील निर्णयाची विभागाने अंमलबजावणी करावी.

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

(संजय काटकर, भाप्रसे)
प्रशासक तथा आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रत :- बांधकाम/ विद्युत विभागाकडे योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना

PC-02/DK/24-25/MT-5